मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » बुधवार, दि. 24 सप्टेंबर 2025 | पान- 1

# चिखलीकर तब्बल सतरा तास अंधारात

## सातत्याने वीजसंकटाचा कायस्वरूपी तोडगा काढण्याची मागणी; उद्योजकांसह नागरिक हैराण

**पिंपरी | प्रतिनीधी**

नेवाळे वस्तीमध्ये असलेल्या मुख्य केबलमध्ये तांत्रिक बिघाड झाल्यामुळे तब्बल सतरा तास वीपुरवठा खंडीत झाला. सातत्याने वीजपुरवठा खंडीतच्या घटना सुरु असल्याने हैराण असलेल्या चिखलीकरांनी कायमस्वरूपी तोडगा काढण्याची मागणी केली आहे. सोमवारी (दि.२२) रोजी एकीकडे जोराचा पाऊस तर दुसरीकडे वीज गायब त्यामुळे चिखलीकरांना पूर्ण रात्र अंधारात काढावी लागली. उद्योजकांसह नागरिक हैराण झाले.

चिखली हा संपूर्ण कामगार वस्तीचा परिसर आहे. घरकुल, हरगुडे वस्ती येथून जाणारी आणि या परिसराला वीज पुरवठा करणारी मुख्य वीज वाहिनी सोमवारी रात्री साडेनऊ वाजण्याच्या सुमारास जळाली. त्यामुळे, चिखलीतील मोरे वस्ती, नेवाळे वस्ती, राधा सत्संग आश्रम परिसर, सोनवणे वस्ती रस्ता, ताम्हाणे वस्ती म्हेत्रे वस्ती, तळवडे येथील रस्त्याच्या पूर्वेकडील काही भाग, चिखली कुदळवाडी उपकेंद्र परिसरातील काही भागांचा वीज पुरवठा खंडित झाला. रात्रभर सुरू असलेल्या पावसामुळे केबल दुरुस्तीच्या कामांमध्ये अडथळा येत होता. त्यामुळे केबल दुरुस्तीच्या कामाला उशीर झाला आणि संपूर्ण रात्र नागरिकांना अंधारात काढावी लागली.

**सातत्याने वीजपुरवठा खंडीत चिखलीकर त्रस्त**

पाऊस आला, गुरुवार आला, केबल फॉल्ट अशा एक ना अनेक कारणासाठी चिखलीतील वीज खंडीत होते. एकदा वीज गेली की तासन्‌तास येत नाही. सतत होत असलेल्या वीजपुरवठा खंडीतला नागरिकांसह उद्योजक त्रस्त झाले आहेत. दुसऱ्या दिवशी वीजपुरवठा लवकर सुरुळीत न झाल्यास पाणीपुरवठ्यावर परिणाम होतो. शाळकरी मुले, कामगार, नोकरदार यांना अंघोळ न करताच कामावर जावे लागते. शाळकरी मुलांना शाळेत पाठविण्यासाठी आवराआवर करताना पालकांची मोठी गैरसोय झाली.



> “ चिखली परिसरातील वेगवेगळ्या भागांमध्ये आठवड्यात दोन ते तीन वेळा वीज पुरवठा खंडीत होतो. त्यातच मोठा बिघाड झाल्यानंतर वीज पुरवठा सुरळीत होण्यासाठी किमान १५ ते २० तास लागतात. विजेचा लपंडाव ही नित्याची बाब होऊन बसली आहे. हे प्रकार टाळायचे असतील आणि वीज पुरवठा सुरळीत ठेवायचा असेल; तर जुन्या केबल बदलून नवीन केबल टाकणे गरजेचे आहे. याबाबत महावितरण विभागाला सातत्याने निवेदन दिले जात आहेत.
>
> **- विकास साने, सामाजिक कार्यकर्ते**

> “ महावितरणच्या अधिकाऱ्यांना सातत्याने खंडीत होणाऱ्या वीजपुरवठेबाबत बैठका घेतल्या आहेत. नेवाळे वस्ती परिसरामध्ये ऐश्वर्यम कोर्टयार्ड च्या इथे नवीन स्विच उपकेंद्र उभारण्यात येणार आहे. त्यामुळे एका भागाचा वीज पुरवठा खंडित झाल्यानंतर तो दुसरीकडून सुरळीत ठेवता येईल. असे त्यांनी सांगितले. त्यासाठी किमान सहा महिन्यांचा कालावधी लागणार असे सांगितले आहे. मात्र लवकरात-लवकर ही प्रक्रिया पूर्ण करून चिखलीकरांचा त्रास कमी करावा अशी मागणी केली आहे. सातत्याने वीजसमस्यांचा सर्वांना त्रास सहन करावा लागतो आहे.
>
> **- कुंदन गायकवाड, मा.नगरसेवक.**

> “ पावसाळा सुरु असल्याने केबल बिघाडच्या घटना घडतात. सोमवारी रात्री झालेला बिघाड शोधण्यासाठी उशीर लागला. त्यामुळे वीज पुरवठा दुरुस्त करून सुरळीत करण्यास विलंब झाला. बिघाड शोधल्यानंतर रात्रभर काम सुरू होते. दुरुस्ती केल्यानंतर लगेचच वीजपुरवठा सुरू करण्यात आला आहे. नेवाळे वस्ती परिसरामध्ये नवीन स्विच उपकेंद्र उभारण्यात येणार आहे. त्यामुळे एका भागाचा वीज पुरवठा खंडित झाल्यानंतर तो दुसरीकडून सुरळीत ठेवता येईल.
>
> **- अतुल देवकर, कार्यकारी अभियंता, महावितरण, भोसरी विभाग.**

# चिखलमय रस्त्यांतून वाट शोधताना पुनावळेकर हैराण

## संथगतीने सुरु असलेल्या रस्त्यांची कामे तत्काळ पूर्ण करण्याची मागणी

**पिंपरी | प्रतिनीधी**

परिसरातील कोयतेवस्ती, गायकवाड वस्ती, ढवळेनगर, माळवाडी या ठिकाणी रस्त्यांची कामे सुरु आहेत. मात्र रखडलेल्या कामांमुळे चिखलमय रस्त्यांतून वाट शोधताना पुनावळेकर हैराण झाले आहेत. चिखलमय रस्त्यांवर दुचाकी अपघाताचे प्रमाण वाढते आहे. त्यामुळे संथगतीने सुरु असलेले कामकाज तत्काळ मार्गी लावण्याची मागणी भाजपा पिंपरी-चिंचवड शहराचे सचिव नवनाथ ढवळे यांनी शहर अभियंता मकरंद निकम यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

पुनावळेच्या प्रवेशद्वारापासून रस्त्यांची कामे सुरु असल्याने अन् पावसामुळे रस्ते चिखलाने माखले आहेत. तर काही ठिकाणी रस्त्यांवर मोठ-मोठे खड्डे, खडी पसरली आहे. पावसामुळे खड्डयांत पाणी साचल्याने वाहनचालकांना अंदाज लावता येत नाही. अंदाज न आल्याने गाडी घसरल्याच्या घटना घडत आहेत. तर कोयतेवस्ती, ढवळेनगर, गायकवाड वस्ती, माळवाडी परिसरात रस्त्यांची सुरु असलेली संथ गतीने कामकाज अन् रस्त्यांची चिखलमय झालेली दुर्दशा त्यामुळे पुनावळेकर त्रस्त झाले आहेत. मुलांना सकाळी शाळेत सोडताना पालकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागतो आहे. कामावर जाताना, रात्री अंधारात त्या रस्त्यावरून घरी जाणे म्हणजे मोठे जिकरीचे काम ठरत आहे.



> “ मागील एक वर्षापासून या रस्त्यांची कामे सुरु आहेत. या रस्त्यांची कामे संथ गतीने सुरु असल्याने नागरिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. पावसामुळे रस्ते चिखलमय झाले आहेत. एक ही रस्ता चांगल्या अवस्थेत नाही. संथ गतीने सुरु असलेले रस्त्यांची कामे प्राधान्याने लवकरात-लवकर पूर्णत्वास न्यावी.
>
> **- नवनाथ ढवळे, भाजपा शहर- जिल्हा सचिव.**

> “ यंदा मे पासून पाऊस सुरु झाला आहे. त्यात या परिसरातील रस्त्यांच्या निविदा काढण्यास उशिर झाला. मात्र रस्त्यांची कामे सुरु आहेत. सध्या पाऊस पडल्यामुळे आणि रस्त्यांची कामे सुरु असल्याने रस्ते चिखलमय झाले आहेत. नागरिकांना त्रास होतोय पण प्राधान्याने रस्त्याची कामे पूर्ण करू.
>
> **- मकरंद निकम, शहर अभियंता.**

# तृतीयपंथीयांसाठी चारचाकी वाहन प्रशिक्षण योजनेस स्थायी समितीची मंजुरी

## पिंपरी चिंचवड महापालिकेच्या स्थायी समिती बैठकीत विविध विषयांना मान्यता

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या समाज विकास विभागामार्फत तृतीयपंथी घटकांच्या सक्षमीकरणासाठी व समाजात त्यांचा आत्मविश्वास वाढविण्यासाठी विविध उपक्रम हाती घेतले जात आहेत. याच अनुषंगाने तृतीयपंथी घटकांना चार चाकी हलके वाहन चालविण्याचे प्रशिक्षण देण्याची योजना हाती घेण्यात आली आहे. या योजनेला स्थायी समितीच्या आजच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. या निर्णयामुळे तृतीयपंथी घटकांना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होतील.

पिंपरी चिंचवड महापालिका पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीतील दिवंगत महापौर मधुकर पवळे सभागृहात स्थायी समितीची बैठक संपन्न झाली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह होते. यावेळी सादर करण्यात आलेल्या विविध विषयांची माहिती घेत आयुक्त शेखर सिंह यांनी मान्यता दिली व शहरात सुरु असलेल्या विकासकामांचा विभागनिहाय आढावाही घेतला. या बैठकीस अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर, नगरसचिव मुकेश कोळप तसेच विषयाशी संबंधित विभागप्रमुख आणि अधिकारी उपस्थित होते.



**महापालिकेतील विविध ३९ विषयांना मान्यता**

आज झालेल्या स्थायी समिती बैठकीत पिंपरी चिंचवड महापालिका शाळांमध्ये शून्य कचरा प्रकल्प, स्वच्छ सन्मान सोहळा व स्वच्छ सर्वेक्षण २०२५-२६ ची पूर्वतयारी साठी प्रॉडक्शन मॅनेजमेंट कामकाज खर्चास मान्यता देणे, यशवंतराव स्मृती रुग्णालय येथे पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या विद्यार्थी प्रवेश क्षमतेत वाढ करणेबाबत व त्या संदर्भातील शैक्षणिक शुल्क महाराष्ट्र आरोग्य विद्यापीठ नाशिक यांना अदा करणे, ब क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील मलनि:सारण नलिका मॅनहोल चेंबर्सची साफसफाई आधुनिक यांत्रिकी पद्धतीने करणे या कामास मुदतवाढ देणे, नवीन जिजामाता रुग्णालय येथील महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळाकडील नोंदणीसाठी केलेल्या अर्जाची कंन्सेन्ट ऑथरायझेशन फी व तपासणीनंतर महामंडळाकडून कळविलेल्या पेनल चार्जेस भरणे, नवीन जिजामाता रुग्णालयासाठी लिथियम पॉलिमर बॅटरी साहित्य खरेदी करणे, प्रभाग क्रमांक २ कुदळवाडी परिसरातील डीपी रस्ते विकसित करण्यासाठी चालू विकास कामांच्या सुधारित अंदाजपत्रकात मान्यता देणे, प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत पिंपरी चिंचवड महापालिका क्षेत्रात महापालिकेतर्फे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी डुडूळगाव येथे निवासी गाळे बांधणे यासह विविध ३९ विषयांना मान्यता देण्यात आली.

याशिवाय स्थायी समिती अधिकारांतर्गत मा. प्रशासक यांच्याकडील ठराव महापालिका सी एस आर अंतर्गत नोंदणी करण्यास मान्यता देणे, तृतीयपंथी घटकांना चार चाकी हलके वाहन चालविण्याच्या ड्रायव्हिंग प्रशिक्षण योजना राबविणे आदी विषयांना येणाऱ्या खर्चास प्रशासक शेखर सिंह यांनी मान्यता दिली.

# महापालिकेकडून भक्ती शक्ती चौकात 25 सप्टेंबरला स्वच्छता मोहिमेचे आयोजन




**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने केंद्र सरकारच्या ‘एक दिवस – एक तास – एक साथ’ या उपक्रमांतर्गत निगडी येथील भक्ती शक्ती चौक येथे २५ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ८ वाजता विशेष स्वच्छता मोहीम आयोजित करण्यात आली आहे. या मोहिमेमध्ये जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी केले आहे.

‘स्वच्छता ही सेवा’ अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमामध्ये परिसरात स्वच्छता करण्यासोबतच स्वच्छतेबाबत जनजागृती करण्यात येणार आहे. या मोहिमेत लोकप्रतिनिधी, माजी नगरसदस्य, नगरसदस्य, महापालिकेच्या आरोग्य विभागासह विविध विभागाचे अधिकारी व कर्मचारी, स्वयंसेवी संस्था, महाविद्यालयीन विद्यार्थी, महिला बचतगट सहभागी होणार आहे.

आयुक्त शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, उपायुक्त सचिन पवार यांच्या मार्गदर्शनाखाली राबवण्यात येणाऱ्या या मोहिमेत शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन ‘आपला परिसर, आपली जबाबदारी’ हा संदेश देत प्रत्येकाने समाजहितासाठी एक तास श्रमदान करावे, असे आवाहन महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

# 100 हून अधिक घरफोड्या करणाऱ्या सराईत गुन्हेगाराला सांगवी पोलिसांनी ठोकल्या बेड्या



**पिंपरी | प्रतिनिधी**

१०० हून अधिक घरफोडी करणाऱ्या सराईत गुन्हेगाराला सांगवी पोलिसांनी अटक केली आहे. सांगवी पोलिसांनी आरोपीकडून ६ गुन्हे उघडकीस आणले असून २५ तोळे सोन्याचे दागिने जप्त केले आहेत. जयंत उर्फ जयड्या गोवर्धन गायकवाड असं अटक करण्यात आलेल्या सराईत गुन्हेगाराचं नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सांगवी, दापोडी, भोसरी पोलीस ठाण्याच्या हद्दीत घरफोडी करणाऱ्या सराईत गुन्हेगाराला सांगवी पोलिसांनी सापळा रचून अटक केली आहे. सांगवी पोलीस ठाण्याच्या हद्दीत चार, भोसरी, दापोडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत एक- एक घरफोडी केल्याचं पोलीस तपासात समोर आलं आहे.

सराईत गुन्हेगार जयंत याच्यावर तब्बल ४४ गुन्हे दाखल आहेत. इतर ५३ गुन्हे दाखल असून त्याचा तपास पोलीस करत आहेत. आता सहा गुन्हे उघडकीस आले असून एकूण १०३ घरफोडीचे गुन्हे दाखल आहेत अशी माहिती सांगवी पोलिसांनी दिली आहे.

ही कारवाई पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, गुन्हे पोलीस उपायुक्त शिवाजी पवार, उपायुक्त संदीप आटोळे, सहाय्यक पोलीस आयुक्त विशाल हिरे, सहाय्यक पोलीस आयुक्त सचिन हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र कोळी, सहाय्यक पोलिस निरीक्षक युवराज कलगुटगे, पोलिस उपनिरीक्षक चक्रधर ताकभाते, पोलिस उपनिरीक्षक सुरेश हिंगे यांच्या अधिपत्याखाली सहाय्यक पोलिस फौजदार निशांत काळे, पोलीस हवालदार प्रमोद गोडे, पोलिस अंमलदार विजय पाटील, सहाय्यक पोलिस फौजदार एस. आर. वाघुले, पोलिस हवालदार शैलेश काळभोर या पथकाने केली आहे.

# पुण्यात धावणार 'डबल डेकर' बस

## दिवाळीपासून हिंजवडी, खराडी, मगरपट्टा आयटी पार्कमध्ये इतक्या बस धावणार

**पुणे | प्रतिनिधी**

हिंजवडी, खराडी आणि मगरपट्टा परिसरातील वाहतूक कोंडीतून मार्ग काढण्यासाठी पुणे महानगर परिवहन महामंडळाकडून (पीएमपी) आठवडाभरापासून सुरू असलेली ‘डबल डेकर’ बसची चाचणी यशस्वी ठरली आहे. ‘आयटी पार्क’मधील चार मार्गांबरोबरच देहू-आळंदी हा पाचवा मार्गही निश्चित करण्यात आला आहे. येत्या दिवाळीपर्यंत ‘पीएमपी’च्या ताफ्यात १० डबल डेकर बस तातडीने दाखल करण्याच्या नियोजनाला सुरुवात करण्यात आली आहे.




हिंजवडी, खराडी आणि मगरपट्टा या आयटी क्षेत्रातील वाहतूक कोंडी कर्मचारी आणि कंपन्यांसाठी डोकेदुखी ठरत आहे. त्यामुळे सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत सक्षम पर्याय म्हणून ‘डबल डेकर’ बससाठी ‘पीएमपी’ने पुढाकार घेतला. त्यानुसार १६ सप्टेंबर रोजी चेन्नईतील स्विच कंपनीची डबल डेकर बस पुण्यात दाखल झाली. पहिल्या टप्प्यात कात्रज ते हिंजवडी या मार्गावर प्राथमिक चाचणी घेण्यात आली. या मार्गात कुठलेच अडथळे निर्माण झाले नसल्याने ही चाचणी यशस्वी ठरली.

सामान्य ‘पीएमपी’मध्ये ६० प्रवासी घेऊन जाण्याची क्षमता असताना डबल डेकर बसमध्ये ८५ प्रवासी बसतात. या बसमुळे सार्वजनिक वाहतूक व्यवस्था आणखी सक्षम होऊन वाहतूक कोंडीची समस्या सुटेल, असा अंदाज ‘पीएमपी’चे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक पंकज देवरे यांनी व्यक्त केला. तसेच, आयटी पार्कमधील चार मार्ग आणि देहू आळंदी या पाचव्या मार्गावर ही डबल डेकर येत्या दिवाळीपासून धावणार असल्याचा अंदाज व्यक्त केला.

> “ येत्या दिवाळीपर्यंत पुणेकरांना डबल डेकर बसने प्रवास अनुभवता येण्यासाठी दहा बस तातडीने ‘पीएमपी’च्या ताफ्यात दाखल करण्याचे नियोजन सुरू आहे. नागरिकांची मुख्यत्वे आयटी कंपन्यांमधील कर्मचाऱ्यांची वाहतूक कोंडीतून सुटका होणार आहे. शहराच्या शाश्वत विकासाला हातभार मिळेल.
>
> **- पंकज देवरे, अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, पीएमपी.**

### कोणते आहे मार्ग?

- हिंजवडी फेज एक ते फेज तीन
- रामवाडी मेट्रो स्थानक ते खराडी आयटी पार्क
- मगरपट्टा सिटी ते कल्याणीनगर मेट्रो स्थानक
- पुणे रेल्वे स्थानक ते लोहगाव विमानतळ (विमानतळमार्गे)
- हिंजवडी – देहू आळंदी (शक्यता)

# मुख्यमंत्र्यांचे पुण्यावर विशेष प्रेम; चंद्रशेखर बावनकुळे

## तुम्ही कल्पनाही केली नसेल अशी कामे पुण्यात होतील; चंद्रशेखर बावनकुळे

**पुणे | प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह सर्व भाजप पदाधिकाऱ्यांचे पुण्यावर विशेष प्रेम आहे. त्यामुळेच प्रत्येक दोन आठवड्यांनी मुख्यमंत्री पुण्याला येत आहेत. त्यांच्या स्वप्नातील पुण्याचे इन्फ्रास्ट्रक्चर आदर्शवत असून, २०४७ पर्यंत ते प्रत्यक्षात आणण्याचा आमचा प्रयत्न आहे. हे मी खात्रीने सांगतो कारण त्या इन्फ्रास्ट्रक्चर कमिटीत मी आहे, असे प्रतिपादन महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले. तुम्ही कल्पनाही केली नसेल अशी कामे पुण्यात होतील, असेही ते म्हणाले.

पुणे नवरात्र महोत्सवाच्या उद्घाटन सोहळ्यात ते बोलत होते. गणेश कला क्रीडा मंच येथे सोमवारी (दि. २२) सायंकाळी हा कार्यक्रम पार पडला. या प्रसंगी राज्यमंत्री माधुरी मिसाळ, माजी आमदार उल्हास पवार, माजी मंत्री रमेश बागवे, भाजपचे शहराध्यक्ष धीरज घाटे, महर्षी पुरस्काराचे मानकरी गिरीश प्रभुणे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, अपर पोलीस आयुक्त संजय पाटील, मेधा सामंत, शिरीष देशपांडे, प्रमिला मुदगेकर, डॉ. मयूर कर्डिले, प्रसन्न जगताप, आयोजक आबा बागुल, जयश्री बागुल आदी उपस्थित होते.

केशव शंखनाद मंडळाचे शंखनाद वादन आणि महालक्ष्मीची आरती करून महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. प्रास्ताविकातून आबा बागुल यांनी चंद्रशेखर बावनकुळे यांच्या कार्याचा गौरव करत अनेकांना तुम्ही पक्षात फटाफट घेता, तुम्ही आमचे समाज बांधव आहात, असे म्हणत राजकीय भाष्य केले. तसेच वाहतूक कोंडी फोडण्यासाठीचा सूक्ष्म आराखडा माझ्याकडे आहे, त्याची अंमलबजावणी आपण करावी आणि पुण्यात ‘वन टाईम टॅक्स’पद्धत आणावी, असे आवाहन केले.






बावनकुळे म्हणाले की, पद, पैसा, प्रतिष्ठा यापेक्षा आपण केलेले कार्य हेच कायम राहत. शिवाय महालक्ष्मीच्याच दर्शनाला यायचे होते म्हणून वेळात वेळ काढून मी येथे आलो. मी येथे राजकीय बोलणार नाही, पण आबा आपल्याला आणि परिवाराला आई जगदंबा उदंड आयुष्य देईल, अशी प्रार्थना करतो.

> “ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जीएसटी २८ टक्के वरून ५ टक्के करत देशाला मोठी गिफ्ट दिली आहे. सरकार गरीब आणि मध्यमवर्गीय लोकांचेही कल्याण करत आहे. मोदी यांनी दिलेला स्वदेशीचा मूलमंत्र २०४७ चा भारत घडवेल.
>
> **- चंद्रशेखर बावनकुळे, महसूलमंत्री**

# रस्त्यावर पिचकारी मारणे पडले भारी

## 22 महिन्यांत 7 कोटींचा दंड, 1 लाख निर्लज्जांवर कारवाई; महापालिकेचा इशारा



**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या वतीने सार्वजनिक जागी थुंकणे, कचरा जाळणे, अस्वच्छता करणे, अशा कारणांसाठी दंडात्मक कारवाई केली जाते. त्यानुसार गेल्या २२ महिन्यांत १५ क्षेत्रीय कार्यालयांनी १ लाख १३ हजार २७७ लोकांना दंड करत ७ कोटी ६ लाख ७ हजार रुपयांचा दंड वसूल केला आहे.

पुणे महापालिकेने सार्वजनिक जागी स्वच्छता राखण्यासाठी स्वच्छता उपविधी तयार केली आहे. त्या नियमानुसार अस्वच्छता करणाऱ्या नागरिकांवर दंडात्मक कारवाई केली जाते. यामध्ये सार्वजनिक जागी थुंकणे, लघवी करणे, कचरा जाळणे, कचऱ्याचे सुका आणि ओला असे वर्गीकरण न करणे, नदीत राडारोडा टाकणे, अशा गोष्टींचा समावेश आहे. यासाठी १८० रुपयांपासून ते ५ हजार रुपयांपर्यंतच्या दंडाची तरतूद आहे. यानुसार महापालिका घनकचरा व्यवस्थापन विभाग कारवाई करत आहे. २०२३ च्या ऑक्टोबर महिन्यापासून २०२५च्या ऑगस्टपर्यंत म्हणजे २२ महिन्यांत कारवाई केल्याची ही आकडेवारी आहे.

सार्वजनिक ठिकाणी थुंकण्याबद्दल २२५७ लोकांकडून २२ लाख ६५ हजार दंड वसूल करण्यात आला. सार्वजनिक ठिकाणी लघवी करणाऱ्या ११ हजार ३३१ जणांकडून २२ लाख ८० हजार रुपये वसूल केले. कचरा जाळणाऱ्या १हजार ४८६ लोकांकडून १२ लाख २६ हजार वसूल करण्यात आले. कचऱ्याचे वर्गीकरण न केल्याबद्दल ६ हजार ८१७ लोकांकडून १६ लाख ७६ हजार रुपये वसूल करण्यात आले. सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता करणाऱ्या ८५ हजार ६९४ लोकांकडून ४ कोटी रुपयांचा रुपये वसूल करण्यात आले. बल्क वेस्ट जनरेटर कचरा प्रक्रिया प्रकल्प बंद बाबत २२२ जणाकडून १३ लाख २५ हजार वसूल केले. बांधकाम राडारोडा टाकणाऱ्या १ हजार ०६४ लोकांकडून ५६ लाख ८६ हजार २५० रुपये वसूल करण्यात आले आहेत. २ हजार ४०० लोकांवर प्लॅस्टिक कारवाई करत १ कोटी २१ लाख ९५ हजार वसूल करण्यात आले. त्यांच्याकडून ९ हजार ८७६ किलो प्लॅस्टिक जमा करण्यात आले आहेत.

> “सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता ठेवणे ही नागरिकांचीदेखील जबाबदारी आहे. त्यामुळे नागरिकांनी सार्वजनिक ठिकाणी थुंकणे, अस्वच्छता करणे, कचरा जाळणे टाळावे; अन्यथा दंडात्मक कारवाईला सामोरे जावे लागेल.
>
> **- संदीप कदम, उपायुक्त, घनकचरा व्यवस्थापन विभाग, पालिका.**

# उजनी धरणातून विसर्गात सतत बदल

## भीमा नदीचा पाणीसाठा तुडुंब; नदीकाठच्या गावांना प्रशासनाचे सतर्कतेचे आवाहन



**पुणे | प्रतिनिधी**

उजनी धरणातून भीमा नदीत सोडण्यात येत असलेल्या पाण्यामध्ये सतत चढ-उतार होत आहे. सोमवारी (दि. 22) पहाटे 5.45 वाजता पाण्याचा विसर्ग वाढवून तो तब्बल 70 हजार क्युसेक करण्यात आला; मात्र नंतर 11.30 वाजता 50 हजार क्युसेक, तर पुन्हा दुपारी 1.30 वाजता कमी करून तो 30 हजार क्युसेक एवढा करण्यात आला. दरम्यान, रात्री 8.30 वाजता पुन्हा या विसर्गात वाढ करून तो 40 हजार क्युसेक करण्यात आला आहे.

सध्या भीमा नदीचे पात्र सध्या पाण्याने तुडुंब भरून वाहत आहे. त्यामुळे प्रशासनाने इंदापूर, माढा, माळशिरस तालुक्यातील नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. उजनी धरणाच्या पाणलोट क्षेत्रामध्ये होणाऱ्या पावसाचे प्रमाण कमी जास्त होत असल्याने, उजनीतून भीमा नदीमध्ये सोडण्यात येणाऱ्या पाण्याचे प्रमाणदेखील पूर नियंत्रणासाठी सातत्याने कमी-जास्त करावे लागत आहे.

उजनी धरणामध्ये सोमवारी सायंकाळी 6 वाजता 121.62 टीएमसी पाणीसाठा असून, त्यामध्ये उपयुक्त पाणीसाठा 57.96 टीएमसी एवढा आहे. सध्या धरणामध्ये 108.09 टक्के उपयुक्त पाणीसाठा झालेला आहे. उजनी धरणाच्या सांडव्यातून भीमेत 30 हजार क्युसेक क्षमतेने तर वीजनिर्मितीसाठी 1 हजार 600 क्युसेक याप्रमाणे नदीपात्रात सध्या एकूण 31 हजार 600 क्युसेक एवढ्या क्षमतेने विसर्ग सुरू आहे.

धरणातील पाण्यातून सीना-माढा उपसा सिंचन योजनेसाठी 180 क्युसेक, बोगद्यामधून 200 क्युसेक तर मुख्य कालव्यातून 600 क्युसेक याप्रमाणे पाण्याचा विसर्ग सुरू आहे. दरम्यान, दौंड येथून सोमवारी सायंकाळी 6 वाजता उजनी धरणामध्ये येणाऱ्या पाण्याचा विसर्ग 12 हजार 935 क्युसेक एवढा होता.